# प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे.

Mid Day Meal Scheme

# प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजना योजनेंतर्गत कार्यरत स्वयंपाकी तथा मदतनीस यांना प्रशिक्षण देण्याबाबत संस्थेची निवड करण्यासाठी स्वारस्याची अभिव्यक्ती अर्ज प्रक्रीया.

**पत्ता**

**प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजना**

प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

विभागीय शिक्षण उपसंचालक (पुणे) कार्यालयाचे आवार,

१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११ ००१.

दूरध्वनी क्रमांक: ०२०-२६१२८१५७

ई-मेल आयडी: mdmeoi2019@gmail.com

१. **व्याख्या:-**

स्वारस्याची अभिव्यक्ती प्रक्रीया मसुद्यात वापरण्यात आलेल्या संक्षिप्त नाव, बाबींचा संबंधित अर्थ अथवा व्याख्या खालीलप्रमाणे राहील.

**I.** "स्वीकृती प्राधिकारी" म्हणजे शिक्षण संचालक (प्राथमिक) प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

**II.** "शिक्षण संचालक (प्राथमिक)" म्हणजे शिक्षण संचालक (प्राथमिक) प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

**III.** "निविदाकार" म्हणजे निविदा अर्ज खरेदीस इच्छूक असलेली आणि निविदेमध्ये संभाव्य निविदाकार म्हणून प्रतिसाद देण्यास इच्छूक असलेली वैध संस्था / कंपनी.

**IV.** "कंत्राट/कामकाज" म्हणजे निविदा मसुद्यातील अटी व शर्ती स्वीकृतीनुसार शिक्षण संचालक (प्राथमिक) आणि कंत्राटदार या उभय पक्षामध्ये केलेला करारनामा, ज्यामध्ये सर्व सहपत्रे तथा विवरणाचा (निविदा सहपत्रे, निविदा सूचना, निविदेतील सहमतीपत्रे, निविदेतील साधारण आणि विशेष अटी शर्तींचे परिशिष्ट निहाय सहमतीपत्र, दर्जा व तांत्रिक विवरण, व्यापारी लिफाफा विवरणपत्र इ.) समावेश आहे. उक्त नमूद सर्व कागदपत्रे / सहपत्रे एकत्रितपणे एक करार तयार करणारी मानली जातील आणि एकमेकांना पूरक असतील. कंत्राट हा निविदेतील उक्त सहपत्र, विवरण पत्रांसह तसेच तद्नंतर निविदेंतर्गतच्या सहमतीने सामील केलेल्या सहपत्र, विवरण पत्रांसह केलेला लेखी करारनामा असेल.

**V.** "अर्जदार" म्हणजे या निविदेनुसार स्वयंपाकी तथा मदतनीस यांना (अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ अंतर्गत) प्रशिक्षण देण्याबाबत काम स्वीकारणारी आणि स्वतंत्र अथवा वैयक्तिक कायदेशीर प्रतिनिधीत्व समाविष्ट असलेली मालकी हक्क/ भागीदारी संस्था अथवा कंपनी.

**VI.** "कंत्राट कालावधी" म्हणजे कराराचे दिनांकापासून निविदेमध्ये नमूद केलेले पुरवठ्याचे संपूर्ण कामकाजाच्या अंमलबजावणीसाठी लागणारा कालावधी.

**VII.** "दिवस" म्हणजे आठवड्यातील कोणत्याही दिवशी प्रत्यक्ष केलेल्या कामाच्या तासांची संख्या विचारात न घेता मध्यरात्रीपासून ते मध्यरात्रीपर्यंतचा चोविस (२४) तासांचा अवधी.

**VIII.** "कार्य दिवस / दिन" म्हणजे सार्वजनिक सुट्टीचा दिवस वगळता असणारा शालेय कामकाजाचा दिवस.

**IX.** "जिल्हा" म्हणजे मसुद्यातील मुद्दा क्रमांक ५.१ मध्ये नमूद असलेला राज्यातील कोणताही जिल्हा. जिल्ह्यामध्ये मुंबई (मुंबई उपनगर + मुंबई शहर) असा सयुंक्त जिल्हा समजण्यात येईल.

**x.** FOSTAC नामनिर्देशित संस्था म्हणजे "अन्न सुरक्षा मानदे कायदा, २००६ नुसार Food Safety Training and Certification (FOSTAC) करीता Empanelled असणारी संस्था."

## २. स्वारस्याची अभिव्यक्ती सूचना:-

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना अंतर्गत कार्यरत असणाऱ्या सर्व स्वयंपाकी तथा मदतनीस यांना अन्न सुरक्षा व मानदे विभागाकडील नोंदणीकृत यंत्रणेमार्फत प्रशिक्षण देण्याचे निर्देश केंद्र शासनाने दिलेले आहेत. प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालयाकडून अनुभवी, नामांकित, आर्थिक दृष्ट्या सक्षम व कुशल मनुष्यबळ असलेल्या पात्र संस्थांकडून प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेंतर्गत स्वयंपाकी तथा मदतनीस यांना अन्न सुरक्षा प्रशिक्षण देण्याकरीता निवड करण्यासाठी स्वारस्याची अभिव्यक्ती प्रक्रियेद्वारे अर्ज मागविण्यात येत आहेत.

- स्वयंपाकी तथा मदतनीस यांना अन्न सुरक्षा प्रशिक्षण देण्याबाबत कामकाजाचा पर्याप्त अनुभव असावा.
- तांत्रिक अर्हतेनुसार अंतिम निवड होणाऱ्या संस्थाना एकूण आठ शैक्षणिक विभागात कामकाजाचे वाटप करण्यात येणार आहे.
- स्वारस्याची अभिव्यक्ती प्रक्रियेचे प्रारूप, अटी व शर्ती यांचे सूक्ष्म वाचन करून अर्ज करण्यात यावा.
- https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर स्वारस्याची अभिव्यक्ती अर्ज प्रक्रीयेकरीता अर्ज करता येईल.
- अंतिम निवड होणाऱ्या संस्थाना देण्यात आलेल्या कामाच्या ३% प्रमाणात सुरक्षा अनामत रक्कम (Security Deposit) State Nodal Officer MDM CELL DPEMS PUNE १ यांच्या नावे देय असलेला राष्ट्रीयीकृत / शेड्यूल्ड बँकेचा धनाकर्ष (DD) सादर करणे अनिवार्य आवश्यक राहील.
- स्वारस्याची अभिव्यक्ती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर थांबविणे, मुदतवाढ देणे अथवा रद्द करण्याचे सर्वाधिकार शिक्षण संचालक (प्राथमिक) यांना राहतील.

## ३. स्वारस्याची अभिव्यक्ती प्रक्रीयेचे वेळापत्रक:-

| | |
|---|---|
| अर्जाची किंमत | रक्कम रूपये ५०,०००/- (नापरतावा)<br>संकेतस्थळावर ऑनलाईन स्वरूपात भरावे. |
| बयाना रक्कम | रक्कम रूपये १३.५० लक्ष |
| कामाची अंदाजित किंमत | एकूण अंदाजित १३.५० कोटी रक्कम रूपये (१.५० कोटी प्रती विभाग) |
| अर्ज सादर करणे | दिनांक १३/०२/२०२३ सकाळी ११.०० ते<br>दिनांक ०३/०३/२०२३ दुपारी ०२.०० वाजेपर्यंत |
| स्वारस्याची अभिव्यक्ती प्रक्रीया निविदा पूर्व बैठक | दिनांक २१/०२/२०२३ सकाळी ११.०० वाजता **स्थळ :-** प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना स्वतंत्र कक्ष, विभागीय शिक्षण उपसंचालक (पुणे) कार्यालयाचे आवार,१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११ ००१. |
| तांत्रिक लिफाफा उघडणे | दिनांक ०६/०३/२०२३ दुपारी ११.०० वाजता |
| तांत्रिक लिफाफ्याचे अंतिमीकरण | नंतर कळविण्यात येईल |
| संस्थांची निवडसूची व कामाचे वाटप करणे | नंतर कळविण्यात येईल |

## ४. योजनेची माहिती :-

- प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करणे, शाळांतील विद्यार्थ्यांची पट नोंदणी व उपस्थिती वाढविणे आणि शाळेतील विद्यार्थ्यांची गळती थांबविण्याकरीता दिनांक २२ नोव्हेंबर, १९९५ पासून केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजना सुरु करण्यात आली आहे. केंद्र व राज्य शासनाच्या, स्थानिक स्वराज्य संस्थाच्या, खाजगी संस्थांच्या अनुदानित/ अंशतः अनुदानित शाळा, वस्तीशाळा, महात्मा फुले शिक्षण हमी योजना केंद्रे यामध्ये इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतचे शिक्षण घेणारे विद्यार्थी प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेचे लाभार्थी आहेत. सद्यस्थितीत राज्यातील ८५,७६१ शाळांमधील १०० लक्ष विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ देण्यात येत आहे.
- सन २००१ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेमध्ये विद्यार्थ्यांना कोरडा तांदूळ न देता शाळेमध्ये शिजविलेले अन्न (Cooked Food) द्यावे अशा स्वरूपाचे आदेश दिले. त्यानुसार, सन २००२ पासून विद्यार्थ्यांना शाळेतच शिजविलेले अन्न मध्यान्ह भोजन स्वरूपात देण्यात येत आहे.
- केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार या योजनेंतर्गत इयत्ता १ ली ते ५ वी च्या विद्यार्थ्यांना ४५० उष्मांक (Calories) आणि १२ ग्रॅम प्रथिने (Proteins) युक्त दुपारचे भोजन (Mid Day Meal) लाभार्थ्यांना देण्यात येते. तसेच ६ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना ७०० उष्मांक (Calories) आणि २० ग्रॅम प्रथिने (Proteins) युक्त दुपारचे भोजन (Mid Day Meal) देण्यात येत आहे.
- राज्यातील स्वयंपाकगृह उपलब्ध असणाऱ्या शाळांना पुरवठेदारामार्फत शासकीय तांदूळाची वाहतुक आणि पुरवठेदाराने स्वखर्चाने धान्यादी मालाचा पुरवठा करण्यात येतो. उक्त वस्तूमधून शाळा स्तरावर अन्न शिजवणाऱ्या यंत्रणेमार्फत अन्न शिजवून विद्यार्थ्यांना देण्यात येते.
- महानगरपालिका/नगरपालिका/कटकमंडळ कार्यक्षेत्रातील स्वयंपाकगृह उपलब्ध नसणाऱ्या शाळा स्तरावर तयार आहाराचा (Cooked Food) पुरवठा बचतगट/ स्वयंसेवी संस्था / अशासकीय संस्थांच्या केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीमार्फत करण्यात येत आहे.

## ५. कामाचे स्वरूप :-

प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेंतर्गत स्वयंपाकी तथा मदतनीस यांना अन्न सुरक्षा मानदे कायदा २००६ नुसार प्रशिक्षण देण्याकरीता संस्थांची नियुक्ती करावयाची आहे.

I. शाळा / केंद्रीय स्वयंपाकगृह स्तरावर कार्यरत असलेल्या स्वयंपाकी तथा मदतनीस यांना अन्न सुरक्षा मानदे कायदा २००६ नुसार प्रशिक्षण देण्यासाठी आठ विभागांची जिल्हानिहाय माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | विभाग | जिल्ह्याचे नाव |
|---|---|---|
| १ | पुणे | पुणे, अहमदनगर, सोलापूर |
| २ | मुंबई | ठाणे, रायगड, पालघर, मुंबई (मुंबई उपनगर + मुंबई शहर) |
| ३ | नाशिक | नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार |
| ४ | कोल्हापूर | कोल्हापूर, सांगली, सातारा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग |
| ५ | औरंगाबाद | औरंगाबाद, परभणी, जालना, बीड, हिंगोली |
| ६ | लातूर | लातूर, उस्मानाबाद, नांदेड |
| ७ | अमरावती | अमरावती, यवतमाळ, अकोला, वाशीम, बुलढाणा |
| ८ | नागपूर | नागपूर, चंद्रपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, गडचिरोली |

**II.** स्वारस्याची अभिव्यक्ती प्रक्रीयेद्वारे दोन संस्थांची निवड करण्यात येईल. सदर संस्थाना ५ (I) (मधील नमूद करण्यात आलेल्या आठ विभागामध्ये कामकाजाचे वाटप करण्यात येईल. विभाग वाटप निश्चित करण्याचे सर्वाधिकार शिक्षण संचालक (प्राथमिक) यांना राहतील.

**III.** स्वयंपाकी तथा मदतनीस यांना अन्न सुरक्षा मानदे कायदा २००६ नुसार प्रशिक्षण देण्यासाठी खालीलप्रमाणे दर निर्धारित करण्यात आले आहेत.

| अ.क्र. | तपशिल | प्रशिक्षणासाठी प्रती स्वयंपाकी निश्चित करण्यात आलेला दर |
|---|---|---|
| १ | स्वयंपाकी तथा मदतनीस यांना प्रशिक्षण देण्यासाठी प्रती स्वयंपाकी याकरीता निश्चित करण्यात आलेला दर (FOSTAC च्या निकषानुसार प्रशिक्षण व प्रशिक्षण साहित्य देणेकरीता) | **रू.६०० + १०८ (१८ % GST) = ७०८/-**<br>(सर्व कर व खर्चासह) |
| २ | प्रती स्वयंपाकी तथा मदतनीस यांना प्रशिक्षणासाठी अनुज्ञेय प्रवास खर्च | **रु.१००/-** |

**IV.** जिल्ह्यात कार्यरत असलेल्या स्वयंपाकी तथा मदतनीस यांना अन्न सुरक्षा मानदे कायदा २००६ नुसार प्रशिक्षण देण्यासाठी तालुका/केंद्र स्तरावर प्रशिक्षित मनुष्यबळ पाठवणे संस्थेस अनिवार्य आहे.

**V.** जिल्ह्यात कार्यरत असलेल्या स्वयंपाकी तथा मदतनीस यांना क्षेत्रिय अधिकारी यांच्या उपस्थितीत प्रशिक्षण देणे संस्थेस अनिवार्य आहे.

**VI.** जिल्ह्यामधील स्वयंपाकी तथा मदतनीस यांना अन्न सुरक्षा मानदे कायदा २००६ नुसार प्रशिक्षण दिल्याची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर त्याबाबतचा अहवाल संबंधित जिल्ह्याच्या शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद यांचेकडून प्रमाणित करून त्याची प्रत संचालनालयास सादर करणे अनिवार्य राहील.

६. **संस्थेच्या पात्रतेचे निकष:-**

I. अन्न सुरक्षा मानदे कायदा २००६ नुसार सदरची संस्था नोंदणीकृत वैध संस्था असावी.

II. संस्था ही आर्थिकदृष्टया सक्षम असणे आवश्यक आहे. अर्ज करणाऱ्या संस्थेची सन **२०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२** या आर्थिक वर्षामध्ये एकूण सरासरी वार्षीक उलाढाल किमान रक्कम रूपये १ कोटी असणे आवश्यक आहे.

III. संस्थेस अन्न सुरक्षा मानदे कायदा २००६ नुसार मागील तीन वर्षामध्ये कमीत कमी २५००० व्यक्तींना अन्न सुरक्षा प्रशिक्षण दिल्याचा अनुभव असणे आवश्यक आहे.

IV. संस्थेस मागील तीन वर्षामध्ये FOSTAC अंतर्गत शासकीय / शासन अंगीकृत उपक्रमांतर्गत कार्यरत व्यक्तींना राज्यस्तरावर कमीत कमी १०००० व्यक्तींना प्रशिक्षण दिल्याचा अनुभव असणे आवश्यक आहे.

V. संस्थेकडे अन्न सुरक्षा मानदे कायदा २००६ नुसार प्रशिक्षण देण्यासाठी अनुभवी, प्रशिक्षित, कुशल मनुष्यबळ आणि पुरेसा कर्मचारी वर्ग असणे बंधनकारक आहे.

VI. प्रयोगशाळा / संस्था आणि संस्थेचे पदाधिकारी यांचे विरोधात कोणतीही फौजदारी गुन्हा दाखल / प्रलंबित नसावा.

VII. संस्थेस केंद्र शासन, राज्य शासन, स्थानिक स्वराज्य संस्था, सार्वजनिक उपक्रम यांच्याकडून काळ्या यादीमध्ये समाविष्ट केलेले नसावे तसेच असमाधानकारक कामकाजामुळे संस्थेचे काम काढून घेण्यात आलेले नसावे.

७. **अर्जासोबत सादर करावयाच्या कागदपत्राची यादी :-**

I. अन्न सुरक्षा मानदे कायदा २००६ नुसार सदरची संस्था नोंदणीकृत वैध नोंदणी प्रमाणपत्र.

II. "अन्न सुरक्षा मानदे कायदा २००६ नुसार **Food Safety Training and Certification (FOSTAC)** करीता **Empanelled** असणारी संस्था." वैध प्रमाणपत्र.

III. संस्थेचे सन २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२ या आर्थिक वर्षाकरीता सनदी लेखापालाने प्रमाणित केलेला ताळेबंद आणि लेखापडताळणी अहवालाच्या वित्तीय प्रपत्रांच्या प्रती **(Audited Balance sheet).**

IV. संस्थेचे सन २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२ या आर्थिक वर्षाचे उत्पन्नावरील कर परिगणनापत्रक आणि कर भरणा पत्रक. वस्तू व सेवा कर **(GST)** परिगणनापत्रक आणि कर भरणा पत्रक (**GSTR 1 आणि GSTR3B**). (माहे मार्च-२०२०, मार्च २०२१ व मार्च २०२२)

V. सन २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२ या आर्थिक वर्षाचे सनदी लेखापालाने प्रमाणित केलेले आर्थिक उलाढालीचे युडीआयएन क्रमांकसह वैध प्रमाणपत्र **(CA Turnover Certificate with valid UDIN)**

VI. संस्थेचे पॅन कार्ड व जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र.

VII. संस्थेचे २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२ या आर्थिक वर्षाचे **Income Tax Returns.**

VIII. संस्थेस अन्न सुरक्षा मानदे कायदा २००६ नुसार मागील तीन वर्षामध्ये कमीत कमी २५००० व्यक्तींना अन्न सुरक्षा प्रशिक्षण दिल्याचा अनुभव असल्या बाबतचे रूपये ५००/- च्या मुद्रांकावर स्वयंघोषणा शपथपत्र **(Self Declaration Affidavit)** सोबतच्या **"परिशिष्ट-१"** प्रमाणे.

IX. संस्थेस मागील तीन वर्षामध्ये FOSTAC अंतर्गत शासकीय / शासन अंगीकृत उपक्रमांतर्गत कार्यरत व्यक्तींना राज्यस्तरावर कमीत कमी १०००० व्यक्तींना प्रशिक्षण दिल्याचा अनुभव असल्या बाबतचे रक्कम रूपये ५००/- च्या मुद्रांकावर स्वयंघोषणा शपथपत्र **(Self Declaration Affidavit)** सोबतच्या **"परिशिष्ट-२"** प्रमाणे.

X. वरील VIII व IX मध्ये नमूद केल्याप्रमाणे ज्या योजने अंतर्गत प्रशिक्षण दिले आहे त्याबाबतचे संबंधित कार्यालयाचे कार्यआदेश **(Work order)** जोडावेत.

XI. संस्थेकडे अन्न सुरक्षा मानदे कायदा २००६ नुसार स्वयंपाकी तथा मदतनीस यांना प्रशिक्षण देणेकरीता **Food Safety Training and Certification (FOSTAC)** नुसार अनुभवी, प्रशिक्षीत व प्रमाणित मनुष्यबळ आणि कर्मचारी यांची माहिती रक्कम रूपये ५००/- च्या मुद्रांकावर स्वयंघोषणा शपथपत्र **(Self Declaration Affidavit)** सोबतच्या **"परिशिष्ट-३"**प्रमाणे.

XII. संस्थेचे मालक, भागीदार आणि इतर कोणत्याही पदाधिकाऱ्याविरूध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल / प्रलंबित नसल्याबाबतचे रक्कम रूपये ५००/- च्या मुद्रांकावर स्वयंघोषणा शपथपत्र **(Self Declaration Affidavit)** सोबतच्या **"परिशिष्ट-४"**प्रमाणे.

XIII. संस्था यांना केंद्र शासन, राज्य शासन, स्थानिक स्वराज्य संस्था, सार्वजनिक उपक्रम यांच्याकडून काळ्या यादीमध्ये समाविष्ट केलेले नसावे तसेच असमाधानकारक कामकाजामुळे संस्थेचे काम काढून घेण्यात आलेले नसल्याबाबतचे रक्कम रूपये ५००/- च्या मुद्रांकावर स्वयंघोषणा शपथपत्र **(Self Declaration Affidavit)** सोबतच्या **"परिशिष्ट-५"** प्रमाणे.

८. **संस्थेची निवड करण्याची कार्यपध्दती :-**

**I.** मुद्दा क्र. ६ मधील पात्रतेच्या निकषानुसार आवश्यक असणारी कागदपत्रे मुद्दा क्र. ७ नुसार सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी करून संस्थांची तांत्रिक अर्हता (पात्र/अपात्र) निश्चित केली जाईल.

**II.** तांत्रिक अर्हतेमध्ये पात्र झालेल्या संस्थांचे मुद्दा क्रमांक १० मध्ये नमूद केल्याप्रमाणे गुणांकन निश्चित करण्यात येईल. सदर गुणांकनामध्ये ७० व त्यापेक्षा अधिक गुण मिळालेल्या संस्थाची अंतिम निवड करण्यात येईल.

**III.** संस्थांना गुणांकनानुसार प्रशिक्षण देण्याबाबतच्या कामकाजाची विभागणी करून देण्यात येईल. तथापि पुरेशा प्रमाणात संस्था पात्र न झाल्यास काम विभागून देण्याचा अधिकार शिक्षण संचालक (प्राथमिक) यांना राहील.

**IV.** संस्थांच्या गुणांकनानुसार कामाच्या विभागणीचा व शैक्षणिक विभाग निश्चितीचा अधिकार शिक्षण संचालक (प्राथमिक) यांचा राहील.

९. **सर्वसाधारण अटी व शर्ती** –

९.१ सदर संस्थेने अन्न सुरक्षा मानदे कायदा २००६ नुसार स्वयंपाकी तथा मदतनीस यांना प्रशिक्षण देण्यासंदर्भात द्यावयाची वार्षिक कामकाजाच्या ३% सुरक्षा अनामत रक्कम (Security Deposit) सादर करणे आवश्यक आहे. सदरची सुरक्षा अनामत रक्कम STATE NODAL OFFICER MDM CELL DPEMS PUNE-१ यांच्या नावे असलेल्या राष्ट्रीयकृत / शेड्यूल्ड बँकेच्या धनाकर्षाव्दारे (Demand Draft) संस्थेची अंतिम निवड झाल्याचे पत्र दिल्यापासून (LOI) पंधरा दिवसात सादर करणे अनिवार्य राहील. सुरक्षा अनामत रकमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

९.२ संस्थेस सुरुवातीस स्वखर्चाने प्रशिक्षण देणे आवश्यक राहील. जिल्हानिहाय प्रशिक्षणाचे अहवाल तसेच विहित नमुन्यातील देयके सादर केल्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार संचालनालय स्तरावरून देयकांची अदायगी केली जाईल. त्याकरीता शासनाकडून कोणत्याही स्वरुपात अतिरिक्त निधी दिला जाणार नाही.

९.३ संस्थेस अन्न सुरक्षा मानदे कायदा २००६ नुसार स्वयंपाकी तथा मदतनीस यांना क्षेत्रिय अधिकारी यांच्या उपस्थितीत प्रशिक्षण देणे बंधनकारक आहे.

९.४ प्रशिक्षण देणाऱ्या कर्मचाऱ्याकडे संस्थेचे अधिकृत ओळखपत्र असणे आवश्यक आहे. संस्थेने सदर कर्मचाऱ्यांच्या माहितीची प्रत क्षेत्रिय अधिकारी यांना देणे बंधनकारक आहे.

९.५ प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेसंदर्भात केंद्र शासन व राज्य शासनाच्या आदेशांची / नियमांची तसेच अन्न सुरक्षा मानदे कायदा २००६ नुसार अंमलबजावणी /संस्थेने करणे अनिवार्य राहील.

९.६ संचालनालयातील / क्षेत्रीय अधिकारी प्रशिक्षणाच्या वेळी उपस्थित असल्यास प्रशिक्षणाविषयी संबंधित अधिकाऱ्यांना संपूर्ण माहिती अवगत करून देण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

९.७ स्वारस्याची अभिव्यक्ती प्रक्रीया अर्जाची किंमत रक्कम रु.५०,०००/- इतकी राहील.

९.८ अर्जदार संस्थेने सादर केलेल्या सर्व कागदपत्र नोटरी करुन सादर करणे अनिवार्य राहील.

९.९ प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेअंर्तगत कार्यरत स्वयंपाकी तथा मदतनीस यांना अन्न सुरक्षा मानदे कायदा २००६ नुसार प्रशिक्षण देणेकरीता मागविण्यात आलेले अर्ज कुठलेही लेखी अथवा तोंडी कारण न देता स्वीकृत करणे, नाकारणे किंवा रद्द करणे याबाबत सर्व अधिकार शिक्षण संचालक (प्राथमिक) यांना राहतील.

९.१० प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेअतंर्गत कार्यरत स्वयंपाकी तथा मदतनीस यांना अन्न सुरक्षा मानदे कायदा २००६ नुसार प्रशिक्षण देणेकरीता निवड झालेल्या संस्थेसोबत करारनामा (Memorandom of Understanding) १ वर्षाकरीता वैध राहील. तसेच करारनाम्याचा कालावधी कमी अथवा जास्त करण्याचा सर्व अधिकार शिक्षण संचालक (प्राथमिक) यांना राहतील.

९.११ संस्थेस नेमून देण्यात येणारा शैक्षणिक विभागामध्ये बदल करण्याचा अधिकार शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे यांना राहतील.

९.१२ प्रशिक्षणाचे कामकाज करतेवेळी संस्थेस कोणतेही कर दयावे लागल्यास त्याचा भरणा संस्थेने स्वत: करणे आवश्यक राहील. तसेच प्रशिक्षणाच्या दरम्यान अपघात झाल्यास अपघातग्रस्तास भरपाई देण्याची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील.

९.१३ संस्थेने प्रशिक्षणाच्या कामकाजाचे अहवाल शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद यांचेकडून प्रमाणित करून शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सादर करणे बंधनकारक राहील. संस्थेने देयके वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या निधी नुसार राज्य स्तरावरुन संबंधित संस्थेच्या बँक खात्यामध्ये जमा केले जाईल. काही तांत्रिक अडचणी व अपरिहार्य कारणामुळे देयकाच्या अदायगीस विलंब झाल्यास कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई अथवा व्याज दिले जाणार नाही.

९.१४ स्वारस्याची अभिव्यक्ती प्रक्रियेद्वारेनियुक्त संस्थेस प्रशिक्षणाचे कामकाज स्वत: करावे लागेल. त्याकरीता त्रयस्थ संस्था नेमता येणार नाही. संस्था त्यांना नेमून दिलेले काम त्रयस्थ संस्थेमार्फत

करत असल्याचे आढळून आल्यास संस्थेस देण्यात आलेले कामकाज कोणतीही पूर्वसूचना न देता रद्द करण्यात येईल.

९.१५ केंद्र व राज्य शासनाने वेळोवेळी निश्चित केलेली कार्यप्रणाली, पद्धती व नियमावलीनुसार प्रशिक्षणाचे कामकाज संबंधित संस्थेस करावे लागेल .

९.१६ संस्थेने चुकीच्या किंवा गैरमार्गाचा अवलंब करून प्रशिक्षणाचा अहवाल सादर केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित संस्था अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ अंतर्गत नियमानुसार कारवाईस पात्र ठरेल. तसेच संबंधित संस्थेस काळ्या यादीत टाकून त्यांची सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल आणि प्रलंबित असलेली देयके अदा करण्यात येणार नाहीत.

९.१७ संस्था अटी शर्तीचे पालन करण्यात असमर्थ / अयशस्वी ठरल्यास त्यांचे काम कोणत्याही प्रकारची लेखी स्वरुपात पूर्वसूचना न देता रद्द करण्याचा अथवा त्या कामाकरीता अन्य संस्था नियुक्त करण्याचा अधिकार शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांना राहील.

९.१८ निवड झालेल्या संस्थेने शिक्षण संचालक (प्राथमिक) यांच्या अटी व शर्तीनुसार करारनामा करणे अनिवार्य राहील. करारानाम्यातील अटी व शर्तीचे उल्लंघन केल्यास करारनामा रद्द करण्याचे अधिकार शिक्षण संचालक (प्राथमिक) यांचे राहतील.

९.१९ प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेंतर्गत कार्यरत स्वयंपाकी तथा मदतनीस यांना अन्न सुरक्षा मानदे कायदा २००६ नुसार प्रशिक्षण देण्याकरीता निवड करण्यात येणारी संस्था ही महाराष्ट्र राज्यातील नोंदणीकृत संस्था असावी.

९.२० प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेंतर्गत कार्यरत स्वयंपाकी तथा मदतनीस यांना अन्न सुरक्षा मानदे कायदा २००६ नुसार प्रशिक्षण दिल्याचे प्रमाणपत्र देणे संबंधित संस्थेस अनिवार्य राहील.

१०. गुणांकन तक्ता

| अ.क्र. | गुणदान निकष | | गुण |
|---|---|---|---|
| १. | आर्थिक वर्ष सन २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२ मधील सरासरी वार्षिक उलाढाल | | कमाल गुण २० - |
| | १.१ | २ कोटी पेक्षा अधिक | २० |
| | १.२ | २ कोटी ते १.५ कोटी | १५ |
| | १.३ | १.५ कोटी ते १ कोटी | १२ |
| | १.४ | १ कोटी पेक्षा कमी | १० |
| २. | संस्थेस मागील तीन वर्षामध्ये अन्न सुरक्षा प्रशिक्षण दिल्याचा अनुभव असणे आवश्यक आहे. | | कमाल गुण ३० - |
| | २.१ | ५०,००१ पेक्षा जास्त प्रशिक्षणार्थी | ३० |
| | २.२ | ५०,००० ते ३५,००१ प्रशिक्षणार्थी | २५ |
| | २.३ | ३५,००० ते २५,००१ प्रशिक्षणार्थी | २० |
| | २.४ | २५,००० पेक्षा कमी प्रशिक्षणार्थी | १० |
| ३. | संस्थेस मागील तीन वर्षामध्ये FOSTAC अंतर्गत शासकीय / शासन अंगीकृत उपक्रमांतर्गत कार्यरत व्यक्तींना राज्यस्तरावर प्रशिक्षण दिल्याचा अनुभव असणे आवश्यक आहे. | | कमाल गुण ३० - |
| | ३.१ | २५,००१ पेक्षा जास्त | ३० |
| | ३.२ | २५,००० ते १५,००१ | २५ |
| | ३.३ | १५,००० ते १०,००१ | २० |
| | ३.४ | १०,००० ते ५,००० | १० |
| | ३.५ | ५,००० पेक्षा कमी | ०० |
| ४. | सहभागी संस्थांचा FOSTAC योजनेंतर्गत असणारा क्रम (आधार : FOSTAC Portal) | | कमाल गुण-१० |
| ४.१ | पहिल्या दहा मध्ये क्रमांक | | १० |
| ४.२ | १० ते २० क्रमांक | | ०५ |
| ४.३ | २० पेक्षा जास्त | | ०० |
| ५. | विभागाचा उद्देश, प्रशिक्षण कार्यक्रमाची सविस्तर रचना, ज्यात अन्न सुरक्षेची ओळख, एजन्सी सर्व प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन आणि व्यवस्थापन कसे करेल, कंपनीच्या मनुष्यबळाचा तपशील इत्यादीवर आधारित संकल्पनात्मक आणि गुणात्मक मुल्यांकनासाठी सादरीकरण / (Presentation) | | कमाल गुण-१० |
| | | एकूण गुण | १०० |

## परिशिष्ट -१

**स्व-घोषणापत्र-अन्न सुरक्षा मानदे कायदा २००६ नुसार व्यक्तींना प्रशिक्षण देण्याचा एकूण अनुभव**

संस्थेने प्रशिक्षण दिल्याच्या माहितीचे स्वयंघोषणा शपथपत्र (Self Declaration Affidavit)

**(रक्कम रूपये ५०० च्या मुद्रांकावर नोटराइज्ड करावे)**

प्रति,
शिक्षण संचालक (प्राथमिक)
प्राथमिक शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**संदर्भ: निविदा क्रमांक प्राशिसं/शापोआ/स्वयंपाकी/मदतनीस/प्रशिक्षण/***EOI/२०२२ -२३ /*****

मी/आम्ही घोषित करतो की, प्रधानमंत्री पोषण आहार योजनेअंतर्गत कार्यरत स्वयंपाकी तथा मदतनीस यांना अन्न सुरक्षा मानदे कायदा २००६ नुसार प्रशिक्षण देण्याकरीता स्वारस्याची अभिव्यक्ती प्रक्रीयेकरीता अर्ज सादर करण्याच्या दिनांकापर्यंत संस्था अन्न सुरक्षा मानदे कायद्यानुसार व्यक्तीना प्रशिक्षण दिल्याचा अनुभव असलेबाबतचे तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | वर्ष | अन्न सुरक्षा मानदे कायद्यानुसार अन्न सुरक्षा प्रशिक्षण दिलेल्या व्यक्तींची संख्या | एकूण |
|---|---|---|---|
| १. | २०१९-२० | | |
| २. | २०२०-२१ | | |
| ३. | २०२१-२२ | | |
| एकूण | | | |

भविष्यामध्ये मी/आम्ही उपरोक्त तक्त्यामधील माहिती अयोग्य सादर केल्याचे आढळून आल्यास अथवा माहिती/तथ्य दडवुन ठेवल्याचे आढळून आल्यास माझी /आमची सदर कृती फसवणुकीची कृती समजून मी/आम्ही स्वारस्याची अभिव्यक्ती प्रक्रीयेकरीता सादर केलेली बयाना रक्कम (EMD) जप्त करून निविदा रद्द करण्याचा अथवा करार केला असल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करून करार रद्द करण्याचा अधिकार शिक्षण संचालक (प्राथमिक) यांचा राहील.

दिनांक:
ठिकाण:
शिक्का:

प्राधिकृत स्वाक्षरी
नाव:
पदनाम:

# परिशिष्ट -२

## स्व-घोषणापत्र - शासकीय / शासन अंगीकृत उपक्रमाअंतर्गत कार्यरत व्यक्तींना प्रशिक्षण दिल्याचा शासकीय अनुभव

संस्थेने शासकीय / शासन अंगीकृत उपक्रमाअंतर्गत कार्यरत व्यक्तींना प्रशिक्षण दिल्याचा माहितीचे स्वयंघोषणा शपथपत्र (Self Declaration Affidavit)

**(रक्कम रूपये ५०० च्या मुद्रांकावर नोटराइज्ड करावे)**

प्रति,
शिक्षण संचालक (प्राथमिक)
प्राथमिक शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**संदर्भ: निविदा क्रमांक प्राशिसं/शापोआ/स्वयंपाकी/मदतनीस/प्रशिक्षण/***EOI/२०२२ -२३ /*****

मी/आम्ही घोषित करतो की, स्वारस्याची अभिव्यक्ती प्रक्रीयेकरिता अर्ज सादर करण्याच्या दिनांकापर्यंत संस्थेने अन्न सुरक्षा मानदे कायद्यानुसार शासकीय / शासन अंगीकृत उपक्रमाअंतर्गत कार्यरत व्यक्तींना प्रशिक्षण दिल्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | वर्ष | शासकीय योजनेचे नाव | अन्न सुरक्षा मानदे कायद्यानुसार FOSTAC अंतर्गत शासकीय / शासन अंगीकृत उपक्रमाअंतर्गत कार्यरत व्यक्तींना प्रशिक्षण दिलेल्या व्यक्तींची संख्या | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | २०१९ - २० | | | |
| २. | २०२० - २१ | | | |
| ३. | २०२१ - २२ | | | |
| एकूण | | | | |

भविष्यामध्ये मी/आम्ही उपरोक्त तक्त्यामधील माहिती अयोग्य सादर केल्याचे आढळून आल्यास अथवा माहिती/तथ्य दडवुन ठेवल्याचे आढळून आल्यास माझी /आमची सदर कृती फसवणुकीची कृती समजून मी/आम्ही स्वारस्याची अभिव्यक्ती प्रक्रीयेकरीता सादर केलेली बयाना रक्कम (EMD) जप्त करून निविदा रद्द करण्याचा अथवा करार केला असल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करून करार रद्द करण्याचा अधिकार शिक्षण संचालक (प्राथमिक) यांचा राहील.

दिनांक: प्राधिकृत स्वाक्षरी
ठिकाण: नाव:
शिक्का: पदनाम:

# परिशिष्ट-३

## स्व-घोषणापत्र - मनुष्यबळ उपलब्धता

संस्थेकडे अनुभवी व कुशल मनुष्यबळ असलेबाबतचे स्वयंघोषणा शपथपत्र (Self Declaration Affidavit)

**(रक्कम रूपये ५०० च्या मुद्रांकावर नोटराइज्ड करावे)**

प्रति,
शिक्षण संचालक (प्राथमिक)
प्राथमिक शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**संदर्भ: निविदा क्रमांक प्राशिसं/शापोआ/स्वयंपाकी/मदतनीस/प्रशिक्षण/***EOI/२०२२ -२३ /*****

मी/आम्ही घोषित करतो की, स्वारस्याची अभिव्यक्ती प्रक्रीयेकरिता अर्ज सादर करण्याच्या दिनांकापर्यंत संस्थेकडे अन्न सुरक्षा मानदे कायद्यानुसार प्रशिक्षण देण्याकरीता एकूण कुशल/अनुभवी कर्मचारी असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | पदनाम | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| १. | | | |
| २. | | | |
| ३. | | | |

भविष्यामध्ये मी/आम्ही उपरोक्त तक्त्यामधील माहिती अयोग्य सादर केल्याचे आढळून आल्यास अथवा माहिती/तथ्य दडवुन ठेवल्याचे आढळून आल्यास माझी /आमची सदर कृती फसवणुकीची कृती समजून मी/आम्ही स्वारस्याची अभिव्यक्ती प्रक्रीयेकरीता सादर केलेली बयाना रक्कम (EMD) जप्त करून निविदा रद्द करण्याचा अथवा करार केला असल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करून करार रद्द करण्याचा अधिकार शिक्षण संचालक (प्राथमिक) यांचा राहील.

दिनांक:
ठिकाण:
शिक्का:

प्राधिकृत स्वाक्षरी
नाव:
पदनाम:

परिशिष्ट-४

## स्व-घोषणापत्र - संस्था मालक, भागीदार / पदाधिकाऱ्याविरूध्द गुन्हा दाखल/प्रलंबित नसल्याबाबत

संस्था मालक, भागीदार आणि इतर कोणत्याही पदाधिकाऱ्याविरूध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल / प्रलंबित नसल्याबाबतचे स्वयंघोषणा शपथपत्र (Self Declaration Affidavit)

**(रक्कम रूपये ५०० च्या मुद्रांकावर नोटराइज्ड करावे)**

प्रति,
शिक्षण संचालक (प्राथमिक)
प्राथमिक शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**संदर्भ: निविदा क्रमांक प्राशिसं/शापोआ/स्वयंपाकी/मदतनीस/प्रशिक्षण/***EOI/२०२२ -२३ /*****

मी/आम्ही घोषित करतो की, स्वारस्याची अभिव्यक्ती प्रक्रीयेकरिता अर्ज सादर दिनांकापर्यंत संस्था मालक, भागीदार आणि इतर कोणत्याही पदाधिकाऱ्याविरूध्द कोणत्याही पोलीस ठाण्यामध्ये कोणताही फौजदारी गुन्हा दाखल/प्रलंबित नाही. तसेच कोणत्याही न्यायालयामध्ये संस्था मालक, भागीदार आणि इतर कोणत्याही पदाधिकाऱ्याविरूध्द फौजदारी गुन्हा बाबतची प्रक्रिया प्रलंबित नाही. भविष्यामध्ये मी / आम्ही याबाबत अयोग्य माहिती अथवा तथ्य सादर केल्याचे आढळून आल्यास अथवा माहिती/तथ्य दडवुन ठेवल्याचे आढळून आल्यास, माझी / आमची सदर कृती फसवणुकीची कृती समजून मी / आम्ही स्वारस्याची अभिव्यक्ती प्रक्रीयेकरीता सादर केलेली बयाना रक्कम (EMD) जप्त करून निविदा रद्द करण्याचा अथवा करार केला असल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करून करार रद्द करण्याचा अधिकार शिक्षण संचालक (प्राथमिक) यांचा राहील. स्वारस्याची अभिव्यक्ती प्रक्रीयेकरीता अर्ज सादर करण्यापासून ते करार होण्याच्या कालावधीपर्यंत माझी / आमची संस्था कामकाजास अयोग्य घोषित करणे, नोंदणी रद्द करणे, नोंदणी खंडित करणे, काळ्या यादीमध्ये समाविष्ट करणे अथवा निलंबीत करण्याची कारवाई केंद्र शासन, राज्य शासन, शासन अंगीकृत उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्था इत्यादीमार्फत करण्यात आल्यास माझी / आमची निविदा रद्द करण्यात येवून त्यास प्रतिसाद देण्यात येणार नसल्याची देखील मी / आम्ही नोंद घेतली आहे.

| | |
|---|---|
| दिनांक: | प्राधिकृत स्वाक्षरी |
| ठिकाण: | नाव: |
| शिक्का: | पदनाम: |

परिशिष्ट-५

## स्व-घोषणापत्र - काळ्या यादीत समाविष्ट नसल्याबाबत

## निविदाकार काळ्या यादीमध्ये समाविष्ट केला नसल्याबाबतचे स्व-घोषणापत्र

**(रक्कम रूपये ५०० च्या मुद्रांकावर नोटराइज्ड करावे)**

प्रति,
शिक्षण संचालक (प्राथमिक)
प्राथमिक शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**संदर्भ: निविदा क्रमांक प्राशिसं/शापोआ/स्वयंपाकी/मदतनीस/प्रशिक्षण/***EOI/२०२२ -२३ /*****

मी/आम्ही घोषित करतो की, स्वारस्याची अभिव्यक्ती प्रक्रीयेमध्ये सादर केलेल्या कोणत्याही वस्तू/बाबीकरीता अथवा वस्तू/बाबीच्या घटकाकरीता माझी / आमची संस्था कामकाजास अयोग्य घोषित करणे, नोंदणी रद्द करणे, नोंदणी खंडित करणे, काळ्या यादीमध्ये समाविष्ट करणे अथवा निलंबीत करण्याची कारवाई केंद्र शासन, राज्य शासन, शासन अंगीकृत उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्था इत्यादीमार्फत स्वारस्याची अभिव्यक्ती प्रक्रीयेच्या सादरीकरण दिनांकापर्यंत करण्यात आलेली नाही. भविष्यामध्ये मी/आम्ही याबाबत अयोग्य माहिती अथवा तथ्य सादर केल्याचे आढळून आल्यास अथवा माहिती/तथ्य दडवुन ठेवल्याचे आढळून आल्यास, माझी /आमची सदर कृती फसवणुकीची कृती समजून मी/आम्ही स्वारस्याची अभिव्यक्ती प्रक्रीयेकरीता सादर केलेली बयाना रक्कम (EMD) जप्त करून निविदा रद्द करण्याचा अथवा करार केला असल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करून करार रद्द करण्याचा अधिकार शिक्षण संचालक (प्राथमिक) यांचा राहील. स्वारस्याची अभिव्यक्ती प्रक्रीयेकरीता अर्ज सादर करण्यापासून ते करार होण्याच्या कालावधीपर्यंत माझी / आमची संस्था कामकाजास अयोग्य घोषित करणे, नोंदणी रद्द करणे, नोंदणी खंडित करणे, काळ्या यादीमध्ये समाविष्ट करणे अथवा निलंबीत करण्याची कारवाई केंद्र शासन, राज्य शासन, शासन अंगीकृत उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्था इत्यादीमार्फत करण्यात आल्यास माझी / आमची निविदा रद्द करण्यात येवून त्यास प्रतिसाद देण्यात येणार नसल्याचीदेखील मी / आम्ही नोंद घेतली आहे.

दिनांक: प्राधिकृत स्वाक्षरी
ठिकाण: नाव:
शिक्का: पदनाम: